नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १७९ | Issue - 179 | वार शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ | Blow- Saturday Date 16 November 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### मनसेचा जाहीरनामा प्रसिद्ध

मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा विधानसभा निवडणुकीसाठी जाहीर केला आहे. मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना राज ठाकरेंनी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये मूलभूत गरजांपासून मराठी अस्मितेच्या मुद्द्यांना अधोरेखित करण्यात आलं आहे. 'आम्ही हे करू' या नावाने जाहीरनाम्याच्या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. तसंच, आम्ही हे केलं या पुस्तिकेतून त्यांनी त्यांच्या कामांचा आढावा घेतला. राज ठाकरेंनी चार भागात जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यापैकी पहिल्या भागात मुलभूत गरजा, दर्जेदार जीवनमान, पुरेसं अन्न, पिण्याचं पाणी, कायदा, सुव्यवस्था, महिला सुरक्षा, क्रिडा, बालसंगोपन, प्राथमिक शिक्षण आणि रोजगार याचा उल्लेख आहे.

# देहरादूनमध्ये भीषण अपघातात सहा विद्यार्थ्यांचा मृत्यू

## वेगाची स्पर्धा जीवघेणी ठरली; इनोव्हा वाहनाचा चक्काचूर, अपघाताने तरुणांचा शिरच्छेद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देहरादून : उत्तराखंड राज्यात मंगळवारी झालेल्या भीषण अपघातामध्ये सहा विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातापूर्वीचा एक व्हिडीओ आता समोर आला आहे. ज्यामध्ये विद्यार्थी पार्टीत मद्य रिचवत असल्याचे समोर आले आहे. तसेच पार्टीनंतर इनोव्हा गाडीत बसलेले विद्यार्थी एका बीएमडब्लू वाहनाबरोबर वेगाची स्पर्धा करत असल्याचे समोर आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. मंगळवारी झालेल्या अपघातात इनोव्हा गाडीतील सहा विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. ज्यामध्ये तरुणींचाही समावेश आहे. तर सातवा तरूण गंभीर जखमी आहे. अतिवेगाने वाहन चालविल्यानंतर इनोव्हा वाहनाची एका ट्रकला धडक बसली. सदर अपघात इतका भीषण होता की, वाहनात बसलेल्या काही तरुणांचा शिरच्छेद झाला, तसेच इनोव्हा वाहन चक्काचूर झाले.



या अपघातात गुनीत (१९), ऋषभ जैन (२४), नव्या गोयल (२३), अतुल अग्रवाल (२४) आणि कामाक्षी (२०) हे सर्व देहरादून येथे राहणारे आहेत. तर कुणाल कुकरेजा (२३) हा हिमाचल प्रदेश येथे राहणारा आहे. सातवा तरूण सिद्धेश अग्रवाल (२५) हा गंभीर जखमी असून त्याच्यावर सिनर्जी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तो शुद्धीवर आल्यानंतर त्याच्याकडून सदर अपघात कसा घडला, याबद्दल काही माहिती मिळू शकेल, अशी आशा पोलिसांना आहे.

पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सदर वाहन मृत अतुल अग्रवालच्या वडिलांचे होते. अग्रवाल हे सहारनपूर येथील फटाक्याचे व्यापारी आहेत. त्यांनी धनत्रयोदशीला इनोव्हा गाडी विकत घेतली होती. अतुल अग्रवाल इतर सहा मित्रांसह देहरादून येथे गेला होता. त्यावेळी तो स्वतः वाहन चालवत असल्याची माहिती मिळत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इनोव्हा वाहनाची एका ट्रकला देहरादूनच्या किशन नगर चौकात धडक बसली. समोरून येणाऱ्या ट्रकच्या वेगाचा चुकीचा अंदाज घेतल्यामुळे भीषण अपघात घडला. प्राथमिक चौकशीत समोर आले आहे की, ट्रक किशन नगर चौक (पान २ वर....)

# ...तर मतांचे धर्मयुद्ध आपल्यालाही लढावं लागेल

## सज्जाद नोमानींच्या व्हिडीओवरून देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रमुख सज्जाद नोमानी यांनी युट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ शेअर करत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला समर्थन जाहीर केलं आहे. या व्हिडीओ नंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. भाजपाच्या नेत्यांनी हा एकप्रकारे वोटजिहाद असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हिडीओवरून विरोधकांना लक्ष्य केलं आहे.

आज खडवासला येथे भाजपा उमेदवाराच्या प्रचारार्थ सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी भर सभेत सज्जाद नोमानी यांचा व्हिडीओ ऐकवत महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडलं. महाविकास आघाडीच्या विजयासाठी वोट जिहादचा नारा दिला जातो आहे. या वोट जिहादचे मुख्य सुत्रधार कोण? हे आताच तुम्ही ऐकलं. मतांसाठी महाविकास आघाडीचे नेते मुस्लिमांची तवळे चाटत आहेत. हे लोक सांगतात, की आम्ही दंगेखोरांना सोडून देऊ. या ठिकाणी वोटजिहाद होत असेल, तर मतांचे धर्मयुद्ध आपल्यालाही लढावं लागेल. आता आपण एक राहलो, तरच सेफ ( सुरक्षित) राहू, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

काही लोकांचा हेतू फक्त महाराष्ट्रात भाजपाचा पराभव करणं नाही, तर दिल्लीतील भाजपाचे सरकार पाडणंसुद्धा आहे. या देशाला अस्थिर करण्याचं काम हे लोक करत आहेत. यात आता महाविकास आघाडीचाही समावेश झाला आहे. त्यामुळे ही निवडणूक तुमची निवडणूक आहे. ही पुढच्या पिढ्यांसाठीची निवडणूक आहे. आता जर तुम्ही जागे झाला नाहीत, तर नंतर याचे परिणाम भोगावे लागतील, त्यामुळे मी तुम्हाला जागं करण्यासाठी आलो आहे. जर तुमच्या पुढच्या पिढ्या सुरक्षित करायच्या असतील, तर कमळाच्या चिन्हावरील बटन दाबून भाजपाला विजयी करा आणि यांचे नापाक हेतू उधळून लावा, असं आवाहनही देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

सज्जाद नोमानी यांच्या अधिकृत युट्यूब चॅनेलवर सदर व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. १६ मिनिटांच्या या व्हिडीओमध्ये सज्जाद नोमानी यांनी मुस्लीम समाजाला योग्य मतदान करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणतात, मी हे निश्चित सांगू शकतो की, महाराष्ट्राच्या निवडणुकीला आता मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जर इथे हरियाणाप्रमाणेच त्यांचा (भाजपा) विजय झाला तर त्यांचा आत्मविश्वास आणखी मजबूत होईल. त्यानंतर दिल्ली सरकार नव्या आत्मविश्वासाने आपल्या वाईट हेतूंच्या दिशेने मार्गक्रमण करेल. जर महाराष्ट्रात त्यांचा (भाजपाचा) पराभव झाला, दिल्लीमधले त्यांचे सरकार अधिक काळ टीकू शकणार नाही. त्यामुळे आपल्या निशाण्यावर फक्त महाराष्ट्राचे सरकार नाही, तर दिल्लीही आहे.

# पंतप्रधान बड्या उद्योजकांचे हित जोपासतात; राहुल गांधी यांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महागमा (झारखंड) : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. भारतातील गरिबांच्या खर्चावर अब्जाधीशांचे हित साधत असल्याचा आरोप त्यांनी पंतप्रधानांवर केला. झारखंडच्या गोड्डा जिल्ह्यात एका निवडणूक रॅलीला संबोधित करताना गांधी यांनी दावा केला की विरोधक संविधानाच्या रक्षणासाठी लढत आहेत, तर भारतीय जनता पक्ष (भाजप) ती कचरापेटीत टाकण्याचा प्रयत्न करत आहे.



दरम्यान, जात जनगणनेमुळे विविध संस्थांमधील आदिवासी, दलित आणि ओबीसींची स्थिती स्पष्ट होई, असे ते म्हणाले. आम्ही ५० टक्के आरक्षणाची मर्यादा रद्द करू, पंतप्रधान मोदी जे हवे ते करू शकतात, असे जाहीर आव्हानदेखील त्यांनी दिले. मोदी गरिबांना मान देण्याचे बोलतात, पण शेतकऱ्यांचे कर्ज माफ करत नाहीत, अशी टीकादेखील राहुल गांधी यांनी केली. दरम्यान, भाजप हिंसाचार पसरवत असून जात, पंथ आणि धर्माच्या आधारावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत, असे राहुल गांधी म्हणाले. यासोबतच मोदी किंवा त्यांच्या '५६ इंच छाती'ची भीती वाटत नाही , असेदेखील ते म्हणाले. ते (मोदी) अब्जाधीशांचे कठपुतळे आहेत, असे सांगून पंतप्रधान लोकांना 'मन की बात' सांगतात आणि 'धडा शिकवतात' आणि रात्री उद्योगपतींच्या लग्नाचा आनंद लुटतात, असा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार जमिनी बळकावण्यासाठी पाडण्यात आल्याचा दावा गांधी यांनी केला. मुंबईतील धारावी येथील एक लाख कोटी रुपयांची जमीन एका उद्योगपतीला देण्याचा मोदींचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

नरेंद्र मोदी म्हणतात की राहुल गांधी 'लाल किताब' दाखवत आहेत. या पुस्तकाचा रंग महत्त्वाचा नाही. त्यात जे काही लिहिले आहे ते आवश्यक आहे. तुम्ही ते वाचले असते तर तुम्ही लोकांमध्ये द्वेष पसरवला नसता, सगळ्यांना आपसात भांडायला लावले नसते. आमच्यासमोर विचारसरणीची लढाई आहे. भाजप-आरएसएस आंबेडकरांचे संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# सत्ता आली तर मशिदीवरील भोंगे ४८ तासात उतरवेन ; राज ठाकरे




ठाणे/ कल्याण/ दिवा : मशिदीवरील भोंगे काढले पाहिजे, यात दुमत नाही, असे सांगत आमची सत्ता आली तर ४८ तासात मशिदीवरील भोंगे उतरवून सर्वांना वठणीवर आणू, असे विधान मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी शुक्रवारी जाहीर सभेत बोलताना केले. मतांचा अपमान झाला असून त्याचा बदला घेण्याची वेळ आता आली आहे, असेही ते म्हणाले.

मनसेचे ठाणे शहरातील उमेदवार अविनाश जाधव, ओवळा-माजीवडा उमेदवार संदीप पाचंगे, कळवा- मुंब्र्यातील उमेदवार सुशांत सूर्यराव, कल्याण ग्रामीणचे उमेदवार प्रमोद पाटील, कल्याण पश्चिमेतील उमेदवार उल्हास भोईर यांच्या प्रचारासाठी राज ठाकरे यांनी शुक्रवारी तीन ठिकाणी जाहीर सभा घेतल्या. सगळ्या स्वतःच्या सोयीनुसार धर्माच्या गोष्टी सुरू आहेत. हिजाब आणि व्याज घेऊन नेऊ, असे कुरणमध्ये लिहिले आहे. मग, लाऊडस्पीकरचा कुराणमध्ये उल्लेख आहे का, अशी विचारणा करत प्रत्येकाने आपला धर्म घरातील उंबरठ्याच्या आत ठेवावा, असा पुनरुच्चार त्यांनी केला. दुसऱ्यांना त्रास देणे असा कुठला धर्म आहे, अशी विचारणा करत लाऊडस्पीकर लावण्यापेक्षा अलार्म लावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

गेले अनेक वर्षे त्याच, त्याच विषयांवर निवडणुका लढल्या जात आहेत. गेले ५० वर्षे शिक्षण, आरोग्य, पाणी अशा मूलभूत गरजा आजही संपलेल्या नसून याच विषयांवर आजही निवडणुका लढविल्या जात आहेत, त्यामुळे येथील तरुणांना नवीन सुचणार कसे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. विकास, नागरी समस्यांच्या विषयावर कोणीही आमदार, खासदारांना प्रश्न विचारत नाही. निवडणुका आल्या की आपणही त्यांचे गुलाम असल्यासारखे मतदान करतो. निवडणुका म्हणजे आता खेळ होऊन बसलाय, असेही ते म्हणाले. पाच वर्षात एकदा मनसेला (पान २ वर..)

# विकासाची दृष्टी नसणाऱ्यांना विकास निधीचे महत्व कसं कळणार : आ समाधान आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी- मी राजकारणात केवळ आमदारकीसाठी आलो नाही तर तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून दुष्काळी तालुका हा कलंक पुसण्यासाठी आपली सेवा करण्यासाठी आलो असल्यामुळे मी हजारो कोटींचा निधी आणू शकलो परंतु झालेल्या विकास कामांच्या निधीवर अर्थहीन भाष्य करणाऱ्यांना विकासाची कोणतीही दृष्टी नसल्यामुळे त्यांना विकास निधीचे महत्व कसं कळणार असा टोला पंढरपूर मंगळवेढा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा व महायुतीचे उमेदवार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आमदार समाधान आवताडे यांच्या प्रचारार्थ बुधवारी या ब्रह्मपुरी, उचेठाण, बठाण, मुढवी, धर्मगांव, ढवळस, शरदनगर, देगांव, घरनिकी या गावांमध्ये प्रचार सभा पार पडल्या त्यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या अगोदर निवडणुका जवळ आल्या की, दुष्काळ व पाणी प्रश्नावर बोलले जात होते. परंतु मी आमदार झाल्यापासून पाण्याच्या जवळपास सर्व योजना पूर्णत्वास नेल्या आहेत. मी फक्त बोलत नाही तर ते करूनच दाखवतो. येत्या वर्षभरात राहिलेली सर्व विकास कामे पूर्ण होतील आणि आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण आणि परिपूर्ण विकास झाल्याचे चित्र आपणा सर्वांना पहावयास मिळेल. त्याचबरोबर राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्यामुळे राहिलेल्या सर्व विकास प्रकल्पांची ही कामे गतिशील मार्गाने पूर्ण होतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सदर सभेप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित जगताप यांनी बोलताना सांगितले की, गेल्या पन्नास वर्षात आपल्या मतदारसंघाचा विकास खुंटला होता. त्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी आपल्या मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून अतोनात प्रयत्न केले आहेत. विकासाच्या वाटेवर चालणारा एक लोकप्रतिनिधी या नात्याने आपण सर्वांनी त्यांना आमदार करण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सभेसाठी दत्तात्रय जमदाडे, प्रकाश गायकवाड, रयत क्रांती संघटनेचे दीपक भोसले, उद्योजक रामचंद्र सलगर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्याध्यक्ष रामेश्वर मासाळ, माजी संचालक सुरेश भाकरे, संचालक अशोक माळी, राजन पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष औदुंबर वाडदेकर, रुक्मिणी दोलतोडे, शिवसेना तालुकाप्रमुख अशोक चौंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सतीश मोहिते, माजी सरपंच दत्तात्रय नवत्रे, युवराज शिंदे, संभाजी घुले, दिगंबर यादव, विश्वनाथ हेंबाडे, सचिन हेंबाडे भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रवाशांना काढण्यात आलं बाहेर

## अग्निशमन दलाचे १० ते १२ बंब घटनास्थळी

# मुंबईतल्या बीकेसी मेट्रो स्टेशनला आग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतल्या बीकेसी मेट्रो स्टेशनला आग लागली आहे. या ठिकाणाहून प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. अग्निशमन दलाचे १० ते १२ बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत. आगीचं वृत्त समजताच प्रशासनाकडून सर्व मेट्रो ऑपरेशन्स थांबवण्यात आले आहेत. त्यानंतर, मेट्रो ( चींीलरळ चशींी ) स्टेशनमधील सर्वच प्रवाशांना बाहेर काढण्यात आले असून प्रशासनाकडून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. बीकेसी मेट्रो स्टेशन हे अंडरग्राउंड स्टेशन असून पहिल्यांदाच या ठिकाणी आग लागल्याची घटना घडल्याने सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आले आहे. दरम्यान, आगीचं नेमकं कारण अद्याप समजू शकलं नाही. मात्र, वेळीच सावधगिरी बाळगल्याने मोठा अनर्थ टळला.



मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुल परिसरातील मेट्रो लाईन ३ च्या ( चींीलरळ चशींी ) वांद्रे कुर्ला संकुल बीकेसी परिसरात आग लागल्याची घटना आज दुपारी १ वाजून ९ मिनिटांच्या सुमारास घडली या मेट्रो ( चींीलरळ चशींी ) स्थानकाच्या बेसमेंटच्या भागात काम सुरू असताना ही आग लागली. ४०-५० फूट खाली आग लागली असून ह्या ठिकाणी मेट्रो स्थानकाचे काम सुरू होते १०० बाय ६० फूट च्या भागात हे काम सुरू होते या ठिकाणी लाकडं आणि इतर साहित्य असलेल्या भागात ही लागली. जमिनीपासून ४०-५० फूट खाली आग लागल्याने मोठे धुराचे लोट हे स्थानकावर झाल्याची माहिती समोर आली त्यामुळे बीकेसी स्थानकावरील मेट्रोचा ( चींीलरळ चशींी ) प्रवास तात्पुरता बंद करण्यात आला होता. आता तो सुरु करण्यात आला आहे. तसंच आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाला मोठी कसरत आणि शर्यतीचे प्रयत्न करावे लागले आहेत. दुपारी अडीच वाजता सर्व बाजूने आग नियंत्रणात आल्याची माहिती महानगर पालिकेकडून देण्यात आली आहे. या आगीत वित्तहानी झाली आहे तर कोणतीही जीवितहानी नसल्याची ही माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.आरे-जोगेश्वरी- वांद्रे कॉलनी दरम्यानची इतर मेट्रो ( चींीलरळ चशींी ) सेवा नेहमीप्रमाणे सुरू होती. मुंबई अग्निशमन दलाने परिस्थिती नियंत्रणात आणली असून एमएमआरसी आणि डीएमआरसीचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते. फायर ब्रिगेडने आग पूर्णपणे नियंत्रणात आणल्यानंतर आणि दुपारी २:४५ वाजता त्यांची परवानगी मिळाल्यानंतर बीकेसी स्थानकावरील सेवा पूर्ववत करण्यात आल्या. या घटनेत कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झालेली नाही. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत असंही मेट्रोने म्हटलं आहे.

## संपादकीय....

# मतांसाठी धर्मयुद्ध

सज्जाद नोमानी यांच्या अधिकृत युट्यूब चॅनेलवर सदर व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. १६ मिनिटांच्या या व्हिडीओमध्ये सज्जाद नोमानी यांनी मुस्लीम समाजाला योग्य मतदान करण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणतात, मी हे निश्चित सांगू शकतो की, महाराष्ट्राच्या निवडणुकीला आता मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. जर इथे हरियाणाप्रमाणेच त्यांचा (भाजपा) विजय झाला तर त्यांचा आत्मविश्वास आणखी मजबूत होईल. त्यानंतर दिल्ली सरकार नव्या आत्मविश्वासाने आपल्या वाईट हेतूंच्या दिशेने मार्गक्रमण करेल. जर महाराष्ट्रात त्यांचा (भाजपाचा) पराभव झाला, दिल्लीमधले त्यांचे सरकार अधिक काळ टीकू शकणार नाही. त्यामुळे आपल्या निशाण्यावर फक्त महाराष्ट्राचे सरकार नाही, तर दिल्लीही आहे. ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रमुख सज्जाद नोमानी यांनी युट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ शेअर करत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला समर्थन जाहीर केलं आहे. या व्हिडीओ नंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. भाजपाच्या नेत्यांनी हा एकप्रकारे वोटजिहाद असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हिडीओवरून विरोधकांना लक्ष्य केलं आहे. महाविकास आघाडीच्या विजयासाठी वोट जिहादचा नारा दिला जातो आहे. या वोट जिहादचे मुख्य सुत्रधार कोण? हे आताच तुम्ही ऐकलं. मतांसाठी महाविकास आघाडीचे नेते मुस्लिमांची तवळे चाटत आहेत. हे लोक सांगतात, की आम्ही दंगेखोरांना सोडून देऊ. या ठिकाणी वोटजिहाद होत असेल, तर मतांचे धर्मयुद्ध आपल्यालाही लढावं लागेल.

## सत्ता आली तर मशिदीवरील भोंगे ४८ तासात उतरवेन ; राज ठाकरे

(पान १ वरून..) नाशिकची सत्ता मिळाली. त्यावेळी पाच वर्षाच्या आत सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या. मनसे हा एकमेव पक्ष आहे की नागरिकांना भुलविणारी आश्वासने देण्याऐवजी आम्ही काय कामे करणार आणि कशी करणार ते सांगितले आहे. मागील पाच वर्षाच्या काळात महाराष्ट्रात सुरू असलेला राजकीय तमाशा आपण पाहिला आहे. या लोकांनी करून ठेवलेल्या चिखलातून महाराष्ट्राला आपणास बाहेर काढायचे आहे, असे आवाहनही त्यांनी केले. मी प्रामाणिकपणे माझं काम करत आहे. मला कुठल्याही खुर्चीचा मोह नाही. मुख्यमंत्री पदाची माळ गळ्यात पडावी असाही मोह नाही, असेही ते म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणतात की मी प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांची मंदिर बांधणार आहे. पण आपल्याला मंदिर नको तर विद्यामंदिर आणि गड किल्ले बनवायचे आहेत. कारण विद्या मंदिरांची कमतरता आहे आणि गड किल्ले हे पुढच्या पिढीने दाखवायचे आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

## अपघातात सहा विद्यार्थ्यांचा मृत्यू

(पान १ वरून..) येथून प्रवास करत होता. तर इनोव्हा वाहुन बल्लूपूर चौकातून देहरादूनच्या दिशेने जात होते. प्राथमिक चौकशीनुसार, किशन नगर चौक ते ओएनजीसी चौक हे दीड किमींचे अंतर ट्रकने सहा मिनिटांत पार केले होते, याचा अर्थ ट्रकचा वेग सामान्य होता. पण इनोव्हा वाहनाची अपघातानंतरची दृश्ये पाहून अतिवेगाने वाहन चालविल्यामुळेच सदर अपघात झाला असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. इंडिया टुडेने दिलेल्या बातमीनुसार, अपघातापूर्वी या तरुण विद्यार्थ्यांनी पार्टीत मद्य रिचवल्याचा दावा केला आहे. यासाठी त्यांनी एक व्हिडीओही समोर आणला आहे. ज्यामध्ये तरुण संगीताच्या तालावर मद्य घेत असल्याचे दिसत आहे. मात्र हा व्हिडीओ अपघातापूर्वीचा आहे की, त्याआधीचा आहे? याबाबतची खात्री पटलेली नाही. मात्र सदर व्हिडीओ समोर आल्यानंतर मद्याच्या अमलाखाली अपघात झाला का? असा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच याबद्दलची सत्यता समोर येऊ शकते.

# नि:स्वार्थ पक्षपात न करता बातमी हिच खरी पत्रकारिता

आज 'राष्ट्रीय पत्रकार दिन' संपूर्ण भारतात लोकशाहीचा विश्वास प्रस्थापित करून बनलेला चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता. समाजात होणाऱ्या अन्याया विरुद्ध न्याय मिळवून देण्याचं कार्य पत्रकारिता करते. समाजच काय तर देशातील प्रत्येक घटनेच्या मागे या चौथ्या स्तंभाचा महत्वाचा भाग आहे. भारतातील पत्रकारिता कानाकोपऱ्यात पसरावी, त्याची वाढ व्हावी व गुणवत्तात्मक विकास व्हावा, यासाठी केंद्र सरकारने ४ जुलै १९६६ रोजी 'प्रेस काउंसिल ऑफ इंडिया'ची स्थापना केली. सर्व कायदेशीर व प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यावर १६ नोव्हेंबर १९६६ रोजी काऊंसिलचं काम विधिवत सुरू झालं. भारतातील स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारितेचे प्रतीक म्हणून दरवर्षी १६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा केला जातो. याच दिवशी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाने काम करण्यास सुरुवात केली. म्हणून १६ नोव्हेंबर हा दिवस देशातील जबाबदार आणि मुक्त पत्रकारिता दर्शवतो.

स्वतंत्र्यापूर्वी पासून पत्रकारितेनं देशात स्वतंत्र्याचा एक लढा पुकारला होता. वेळेनुसार पत्रकारितेमधे बदल होत गेला आणि आजच्या काळात भारतातीत पत्रकारिता एका वेगळ्या शिगेला गेली आहे. पण या सर्वात पत्रकारितेवर अनेक वेळा आरोप देखील करण्यात आले. ज्यामध्ये आधुनिक काळातील पत्रकारिता सर्वगुण संपन्न जरी झाली खरी. पण त्यामध्ये पोकळी देखील मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य जनतेला दिसून आली. तरी देखील पत्रकारिता मात्र अजूनही थांबली नाही काही अपवाद वगळता आजही त्याच ताकदीने पत्रकारिता राष्ट्रीय स्तरावर होतांना दिसत आहे. ज्या मध्ये देशातील प्रत्येक घटकांचा अभ्यास करत आजची पत्रकारिता एक महत्वाचा पाया रोवतांना दिसत आहे.



भारतातील स्वतंत्र आणि जबाबदार प्रेसचे प्रतीक आहे. हाच तो दिवस होता ज्या दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने नैतिक 'वॉचडॉग' म्हणून काम करायला सुरुवात केली होती की या सशक्त माध्यमाकडून प्रेसने केवळ उच्च दर्जाचीच अपेक्षा ठेवली नाही तर ती कोणत्याही बाह्य घटकांच्या प्रभावाने किंवा धमक्यांमुळे अडकली नाही. जरी जगभरात अनेक प्रेस किंवा मीडिया कौन्सिल आहेत, तरीही प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया ही एक अद्वितीय संस्था आहे. कारण स्वातंत्र्याचे रक्षण करण्याच्या कर्तव्यात राज्याच्या साधनांवरही अधिकार वापरणारी ही एकमेव संस्था आहे. प्रेस कौन्सिलच्या स्थापनेची शिफारस करून पहिल्या प्रेस कमिशनने असा निष्कर्ष काढला होता की पत्रकारितेत व्यावसायिक नैतिकता टिकवून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कायदेशीर अधिकार असलेली संस्था अस्तित्वात आणणे, मुख्यतः उद्योगाशी संबंधित लोक ज्यांचे कर्तव्य मध्यस्थी करणे असेल. यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली आणि स्थापनेपासून विकसित झालेल्या संस्थेने हे उद्दिष्ट नाकारले नाही.

काऊन्सिल ऑफ इंडिया विश्वासार्हता राखण्यासाठी सर्व पत्रकारितेच्या क्रियाकलापांवर लक्ष ठेवते. देशातील सुदृढ लोकशाही राखण्यासाठी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाची महत्त्वाची भूमिका आहे. हे भारतातील प्रेसवर कोणत्याही बाह्य बाबींचा प्रभाव पडणार नाही याचीही खात्री करते. प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया ही एक वैधानिक संस्था आहे, ज्याला प्रिंट मीडियाच्या ऑपरेशनवर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे. प्रेस काऊन्सिल ॲक्ट १९७८ द्वारे जनादेशाद्वारे हे अधिकार मिळाले आहेत. याअंतर्गत एक स्पीकर आणि इतर २८ सदस्य असतात, ज्यापैकी २० प्रेसचे प्रतिनिधीत्व करतात. पाच संसदेच्या दोन सभागृहांद्वारे नामनिर्देशित केले जातात आणि तीनजण संसदेत प्रतिनिधित्व करतात. सांस्कृतिक, साहित्यिक आणि कायदा विषयातून हे निवडले जातात. ही एक वैधानिक, अर्ध-न्यायिक संस्था आहे, जी देखरेखीच्या रुपात काम करते. यामाध्यमातून नैतिकतेचे उल्लंघन आणि पत्रकारिता स्वातंत्र्य उल्लंघनाच्या तक्रारींचे निराकरण केले जाते.

सर्वप्रथम हिकीचे 'बेंगॉल गॅझेट' हे साप्ताहिक इंग्रजी वृत्तपत्र कोलकात्यात १७८० साली सुरू झाले. त्यांनीच भारतात पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. मराठीत बाळशास्त्री जांभेकर यांनी २१ जून १८३२ मध्ये 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले जे १८४० पर्यंत चालले. याच काळात हिंदी व अन्य भारतीय भाषांमध्ये अनेक वृत्तपत्रे सुरू झाली. वृत्तपत्राची संकल्पना त्याकाळी सर्वसामान्यांमध्ये रुजलेली नसल्याने 'दर्पण'ला सुरुवातीला मोठ्या संख्येने वर्गणीदार मिळाले नाहीत. मात्र ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. ब्रिटिश काळामध्ये वृत्तपत्र चालवणे आणि त्याला वाचक मिळवणे हे मोठे कठीण काम होते. मात्र याही काळात पदरमोड करून व कुठलेही नफ्याचे तत्त्व न स्वीकारता या काळामध्ये सुधारकांनी आपले वृत्तपत्र चालवले यामध्ये बाळशास्त्री जांभेकर यांचे 'दर्पण' हे वृत्तपत्र अग्रणी होते. प्रत्यक्षामध्ये या काळातील वृत्तपत्रे ठराविक काळानंतर प्रसिद्ध केली जात असत.

१९५६ मध्ये प्रेस कौन्सिलच्या स्थापनेची शिफारस करून पहिल्या प्रेस कमिशनने असा निष्कर्ष काढला होता की पत्रकारितेत व्यावसायिक नैतिकता टिकवून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कायदेशीर अधिकार असलेली संस्था अस्तित्वात आणणे, मुख्यतः उद्योगाशी संबंधित लोक ज्यांचे कर्तव्य मध्यस्थी करणे असेल. जे लोक त्याची कदर करतात, त्या सर्वांनी हा दिवस साजरा करावा. आज राष्ट्रीय पत्रकार दिना निमित्त प्रसार माध्यमातील सर्व पत्रकार बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा !



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

# कार्तिकी वारीत स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा 'पोलीस मित्र' या उपक्रमात सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी एकादशी बरोबरच वर्षातील महत्वाच्या तीन मोठ्या वाऱ्यांमध्ये स्वेरीचे योगदान हे स्थापनेपासूनच राहिलेले आहे. वारीच्या निमित्ताने विविध संतांच्या मानाच्या पालख्या पंढरीत येत असतात त्यामुळे पंढरीत लाखो वारकरी जमा होतात. वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग, स्थानिक प्रशासन, नगरपालिका व सुरक्षा बंदोबस्तासाठी पोलीस प्रशासन यांचा मोठा ताफा असतो. वारकऱ्यांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी स्वेरीकडून प्रशासनास सहकार्य केले जाते. यावर्षीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस), पंढरपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्तिकी वारीत 'पोलीस मित्र' या उपक्रमात सहभाग घेण्यात आला. या माध्यमातून स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. त्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### प्रशासनासोबत विद्यार्थ्यांनी केली वारकऱ्यांना मदत

यंदाच्या कार्तिकी वारीमध्ये दि. १० नोव्हेंबर पासून ते १२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत तीन दिवस गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील राष्ट्रीय सेवा योजनेतील तब्बल २०० विद्यार्थी व ३० प्राध्यापकांनी पंढरपूर पोलीस प्रशासनाच्या पुढाकाराने 'पोलीस मित्र' बनून वारकऱ्यांची सेवा केली. पंढरपूर शहरात वारकऱ्यांच्या वाढत्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पंढरपूर पोलीस प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, वीर सावरकर चौक, अंबाबाई पटांगण आणि पुंडलीक मंदिर या महत्वाच्या चार ठिकाणी 'पोलीस मदत केंद्र' स्थापित करण्यात आले होते. या पोलीस केंद्राच्या माध्यमातून स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी वारीसाठी आलेल्या वारकऱ्यांची सेवा केली. यामध्ये, वारकऱ्यांना दवाखाने, मठ, मंदीरे, मदत केंद्र, महत्वाचे रस्ते याबाबत स्वेरीचे विद्यार्थी माहिती देत होते तसेच स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने उदघोषणेद्वारे नातेवाईकांपासून चुकलेल्या वारकऱ्यांना समाधान कारक मदत करत होते व सल्ले देत होते. एकूणच स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करत वारकऱ्यांना मदत करून कार्तिकी एकादशी सार्थकी लावली. 'पोलीस मित्र' या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंढरपूरचे डीवायएसपी मा. अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली



पीएसआय मोनिका खडके पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल निर्मला वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी बिरा आवटे, पोलीस नाईक सागर सावंत, पोलीस कॉन्स्टेबल पांडुरंग टिंगरे यांनी कार्यभार हाताळला. संस्थेचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या माध्यमातून व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी.एस. चौधरी, डॉ. एम. एम. आवताडे, प्रा. एस.डी. इंदलकर, प्रा.एम.ए.सोनटक्के, प्रा. के. पी. पुकाळे, प्रा. एस. डी. माळी, प्रा.जी.जी. फलमारी, प्रा. ए.व्ही. भानवसे, इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी यांच्या सहकार्याने तीन दिवस स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी 'पोलीस मित्र' बनून सेवेचे व्रत पूर्ण केले.

# जनतेची सेवा करण्यासाठी नाहीतर मलिदा मिळवण्यासाठी दोघेजण निवडणुकीसाठी उभे राहिले आहेत : नंदकुमार शिंदे

## डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ जवळी येथे रेकॉर्ड ब्रेक सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदारसंघातून सांगोला तालुक्यात गेल्या पाच वर्षात हजारो कोटी निधी आणला आहे असे सांगत आहेत. जय वीरू जोडीचा सार चाळीचा फामूला तुम्ही आम्ही पहिला दोघांनीही पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसे मिळवले गेल्या पाच वर्षात जाणीवपूर्वक दोघांनी सर्वसामान्य जनतेवर अन्याय केला आहे जनतेची सेवा करण्यासाठी नाहीतर मलिदा मिळवण्यासाठी दोघजण निवडणुकीसाठी उभे राहिले आहेत दोघांकडे निष्ठाही चीज नाही तर तुमच्याशी काय प्रामाणिक राहणार असा सवाल माजी जिल्हा परिषद सदस्य नंदकुमार शिंदे यांनी उपस्थित केला.



सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी इंडिया लाईन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉक्टर भाई बाबासाहेब अण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ जवळी येथील अहिल्या चौकात भव्य जाहीर सभा संपन्न झाली यावेळी नंदकुमार शिंदे बोलत होते व्यासपीठावर डॉक्टर अनिकेत देशमुख, विनायक कुलकर्णी, किसान माने, राजेंद्र गावडे, आनंद यलमार, प्रदीप मिसाळ, महेश बंडगर , मायाप्पा यलमार, उपसरपंच भारत सांगोलकर, नितीन गव्हाणे, पिंटू दादा पुकाळे, संगम धांडोरे, यांच्यासह मित्र पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

पुढे बोलताना नंदकुमार शिंदे म्हणाले की सांगोला तालुक्याला दशा आणि दिशा देण्यासाठी ही निवडणूक महत्वपूर्ण आहे गेल्या पाच वर्षात तालुक्यात विकास कसा चालू होता ते आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आलोय बाबासाहेबांनी साठ वर्षे जसे राजकारण केले तसेच राजकारण सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन डॉक्टर बाबासाहेब देशमुख डॉक्टर अनिकेत देशमुख या पुढील काळात करतील असा विश्वास देत शांतता सुव्यवस्था आभारी ठेवण्यासाठी भ्रष्टाचार गुंडगिरी संपवण्यासाठी शाखापच्या पाठीमागे खंबीरपणे उपस्थित राहावे असे आव्हान करत डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना मोठ्या मध्ये मताधिक्याने विजयी करा असेही आव्हान केले आहे

यावेळी अनिकेत देशमुख म्हणाले की महाविकास आघाडीने आम्हाला पाठिंबा दिला असून दहापेक्षा जास्त अपक्ष उमेदवार आणि डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना पाठिंबा दिला आहे सन २०२४ ची विधानसभेची ही निवडणूक धनशक्ती ग्रुप जनशक्ती अशी आहे गेल्या साठ वर्षात आबासाहेबांनी राजकारणात समाजकारण केले आहे सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र येण्यासाठी स्वर्गीय आबांनी काम केले आहे बाबासाहेबांची पुरोगामी विचार आपण सर्वजण तसेच पुढे चालू ठेवणार आहोत येणाऱ्या २० तारखेला सीटीएचिन्ह समोरील बटन दाबून डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना प्रचंड मताने विजयी करा असे आव्हान केले त्यावेळी प्रतापराव देशमुख, विनायकराव कुलकर्णी, गुरुजी सुदर्शन घेरडे, बापूसाहेब ठोकळे, प्रदीप मिसाळ, ललित बाबर सर यांनी आपली मनोगत व्यक्त केली व जवळी येथील अहिल्या चौकीचे झालेल्या रेकॉर्ड ब्रेक सभेसाठी जवळा पंचक्रोशीतील चार वाड्या तसेच घेरडी परिसरातील हजारो युवक कार्यकर्ते ज्येष्ठ नेते मंडळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या सभेच्या सुरुवातीला देशमुख बंधूंचे हलगीच्या खडखडा सहज जंगी स्वागत करण्यात आले व सभेच्या शेवटी घेरडी येथील काही युवक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला.

**आमच्याकडून काही चुका झाल्या असतील तर पण आम्हाला पदरात घ्यावा शाखा भा मध खाणारा पक्ष नसून मताधिक्य घेणारा पक्ष आहे, शेकाप तुमच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी टिकून ठेवला आहे आम्ही राजकारण समाजकारण करू पण लालबावटा खांद्यावरून कधीही उतरू देणार नाही जवळी गाव हे पंचक्रोशी येथील चार वाड्यावरती साठ वर्षात स्वर्गीय आबासाहेबांनी तुम्हाला संरक्षण देण्याचे काम केले आहे निश्चितपणे मागच्या तीन साडेतीन वर्षांमध्ये राजकारण व समाजकारण करीत असताना आमच्याकडून काही चुका झाल्या असतील पण आज तुम्ही आम्हाला पदरात घ्या असे आव्हानही डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# संजीवन समाधी सोहळ्यासाठी श्री. पांडूरंगाच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान

## मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री. संत ज्ञानेश्वर संजीवन समाधी सोहळ्यासाठी मंदिर समितीमार्फत श्री. विठ्ठलाच्या पादुका २०१४ पासून ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर यांचे पायी दिंडी सोबत आळंदी येथे नेण्यात येतात. सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द १५ ते मार्गशिर्ष शुध्द ९ या कालावधीत आळंदी येथे जाऊन परत येत असतो. प्रतिवर्षीप्रमाणे या सोहळ्याचे दि.१५ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रस्थान झाले असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदरचा पालखी सोहळा कार्तिक शुध्द १५ म्हणजे दि. १५ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरहून प्रस्थान करून कार्तिक वद्य ९ दि.२४ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे पोहचणार असून, त्यानंतर दुस-या दिवशी इंद्रायणी स्नान, पालखी प्रदक्षिणा, द्वादशी खिरापत व दि. २८ नोव्हेंबर रोजी श्री संत ज्ञानोबाराय संजीवन समाधी सोहळा संपन्न होत आहे.

पालखी सोहळा प्रस्थानावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, सोहळा मार्गदर्शक तथा सदस्य सल्लागार परिषद ह.भ.प. विठ्ठल महाराज वासकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते.



**कार्तिक शुध्द १५ रोजी गोपाळपूर येथे गोपाळ काला होऊन सर्व संतांच्या दिंड्या मार्गस्थ झाल्या व कार्तिकी यात्रेची सांगता झाली. परंपरेनुसार श्रींच्या पालखींची नगर प्रदक्षिणा झाली. यावेळी श्रींच्या पालखीचे अबाल, वृध्द, अनाथ, दुर्बल, भाविकांनी दर्शन घेतले.**

सदरचा पालखी मार्गशिर्ष शु. ८/९ दि.०९ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र पंढरपूरला परत येत आहे. या पालखी सोहळ्याच्या पायी मार्गावर आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करून सोई सुविधा उपलब्ध करून घेण्यात येत आहेत. याशिवाय, पुजारी तथा सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांची पालखी सोहळा संपर्क प्रमुख पदी (मो.७०२३२३२३६४) नियुक्ती करून जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच या पालखी सोहळ्यासोबत पौराहित्य करणारे कर्मचारी पूर्णवेळ उपस्थित राहणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.




## ग्रामनिधी मधून मागासवर्गीयासाठी १५ टक्के खर्चात अपहार केल्याप्रकरणी ग्रामसेवकाची चौकशी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, धाराशिव तालुक्यातील जवळे (दु) ता. जिल्हा धाराशिव येथील ग्रामपंचायत येथील ग्रामसेवकाने ग्रामनिधी मधून मागासवर्गीयासाठीच्या १५% खर्चात अनियमितता केल्याबाबत सदर प्रकरणाची चौकशी करून ग्रामसेवकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे बाबत जवळे दुमाला येथील श्री सुधाकर रणदिवे यांनी गटविकास अधिकारी यांचे कडे दि.१३ नोव्हेंबर २०२४रोजी लेखी निवेदन दिले आहे.

ग्रामनिधी मधुन दलित वस्ती मागासवर्गीयाकरिता १५% निधीचा सन २०१० ते २०२४ पर्यंत खर्च केलेली माहिती मिळणे बाबतचा अर्ज ग्रामपंचायतकडे दिला होता, त्यावरून ग्राम सेवकांनी सन २०१९ ते २०२३ पर्यंतच्या नमुना नं ५ कॅशबुकमधील माहिती उपलब्ध करुन दिली. दिलेली माहिती व ज्या त्या वर्षाचा ग्रा पं लेखा परीक्षण अहवाल याची पडताळणी करुन पाहिले असता लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद केलेला खर्च व ग्रामपंचायत कॅशबुक मध्ये ग्रामसेवकांनी नोंदविलेला खर्च यामध्ये तफावत दिसून आली, यावरून ग्रामसेवकाने ग्रामनिधी मधील पैशाचा अपहार केला आहे असे श्री रणदिवे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे त्याचबरोबर ग्रामनिधी मधून महिला व बालकल्याणासाठी १० टक्के तर अपंगासाठी ५ टक्के केलेल्या खर्चातही अनियमितता केली असल्याचे म्हटले आहे या प्रकरणाची चौकशी करून ग्राम सेवकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात...

### चोरट्यांनी चोरून नेला मोबाईल

सोलापूर : एकता नगर अतुल गारमेंट येथे मोटरसायकलवरून येऊन कानास लावलेला वीस हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसका मारून चोरून नेल्याची घटना १३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी श्रीनिवास यादगिरी विडप (वय ४०,रा.विनकर वसाहत एमआयडीसी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख हे करीत आहेत.

### दोघा चोरट्यांनी चोरला सोन्याचा नेकलेस

सोलापूर : चंदुकाका सराफ अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड अनेदीप टावर येथे सोन्याचे नेकलेस दाखविताना दोघा अनोळखी इसमांनी ट्रे मध्ये ठेवलेला २३ ग्रॅम ७८० मिली वजनाचा एक लाख ८९ हजार ७१२ रुपये किमतीचा नेकलेस चोरून नेल्याची घटना १२ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अमित संतोष घोडके (वय-३०, रा.कोनापुरे चाळ, फॉरेस्ट) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून एक अनोळखी पुरुष व एका अनोळखी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे चंदूकाका सराफ येथे नोकरीस असून,त्यांनी सोन्याचे नेकलेस दाखविताना यातील दोघा संशयित आरोपींनी फिर्यादीस बोलण्यात गुंतवून व इतर सोन्याचे नेकलेस नेकलेस चोरून नेत फिर्यादीची फसवणूक केली असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई. शिंदे हे करीत आहेत.

### बंद घराचे कुलूप तोडून साठ हजारांचा ऐवज लंपास

सोलापूर : बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश करीत ३० हजार रुपये किमतीचा एचपी कंपनीचा लॅपटॉप, अॅसुस कंपनीचा २५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप आणि पाच हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा टॅब असा एकूण साठ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेण्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी रात्री दहा ते साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी राहुल आर्मस्ट्रॉंग (वय २८, रा. ११, डी विसावा हौसिंग सोसायटी, अश्विनी हॉस्पिटल, सात रस्ता) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

### पार्क करून ठेवलेली चारचाकी गाडी चोरट्याने पळविली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कमर हॉल नई जिंदगी येथे पार्क करून ठेवलेली पांढऱ्या रंगाची हुंदाई कंपनीची वेरना चारचाकी कार (क्रमांक एम एच १३ बीजी ५५५७) ही अज्ञात चोरट्याने १० नोव्हेंबर रोजी दुपारी एक ते सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास सुरू नेल्याची घटना घडली. याप्रकरणी कुमार यल्लाप्पा गडूर (वय-४१, रा.नवीन विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

# मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा व पदाधिकाऱ्यांचा जाहीर पाठिंबा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांना शिवसेना उद्योग बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पंढरपूर शहर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाहीर पाठिंबा मा.आ. मनसे नेते जयप्रकाश बाविस्कर यांच्या उपस्थितीत प्रवेश करण्यात आला.

यावेळी माजी आमदार जयप्रकाश बाविस्कर यांनी माध्यमाची संवाद साधताना म्हणाली की दिली सर्वसामान्य जनतेसाठी धावून जाणारे व्यक्तिमत्व आहे त्यामुळे त्यांना सर्व क्षेत्रातील आणि समाजातील नागरिकांचा जाहीर पाठिंबा दिला आहे त्यांनी राज ठाकरे यांचे विचार घराघरात पोहोचवण्याची काम केलेले आहे त्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित आहे असे त्यांनी सांगितले

यावेळी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाले की या मतदारसंघात कोणत्याही विकास झाला नाही युवा बेरोजगार झाले आहेत महिलांसाठी रोजगार निर्मिती नाही मात्र निवडणुकीत उभारणारे उमेदवारांना याच काही देणे-घेणे नाही ही निवडणूक जरी बुडून श्रीमंत अशी असल्याची त्यांनी सांगितले

एवढी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमाची संवाद साधताना सांगितली पंढरपुरातील महाविकास आघाडी मैत्रीपूर्ण लढत होत आहे मात्र आम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी सर्वसामान्य जनतेसाठी केलेल्या कामामुळे प्रभावित होऊन स्थानिक उमेदवार म्हणून जाहीर पाठिंबा देण्याची देण्यात आले असल्याचे सांगितले

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर समन्वय लंकेश काकासाहेब बुरांडे, शहर संघटक सचिन बनपट्टे, उपशहर प्रमुख विनायक वनारे उपशहर प्रमुख तानाजी मोरे , उपशहर प्रमुख ईश्वर साळुंखे, युवा सेना उप तालुकाप्रमुख प्रदीप पवार, शाखाप्रमुख निखिल पवार, शाखाप्रमुख पिंटू रेड्डी, विभाग प्रमुख पंकज डांगे, विभाग प्रमुख गणेश जाधव, शाखाप्रमुख विजय जाधव, भारत साळुंखे, ऋषिकेश वनारे, भाजप शहर उपाध्यक्ष दीपक बंदपट्टे, भारतीय लोकशक्ती पक्ष शहराध्यक्ष गणेश जाधव अधिक पदाधिकाऱ्यांनी मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.



# अनिल सावंत यांना साहेबांचा आशीर्वाद आहे : जयंत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांना विजयी करण्यासाठी हे भव्य दिव्य अशी सभा आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या पक्षाचे चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस आहे व येथे वीस तारखेला आपण तुतारी वाजवणाऱ्या माणसाचे बटन दाबून त्यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आव्हान त्यांनी केले आहे. पंढरपूर मंगळवेढा हे कायम पवार साहेबांच्या मागेच राहिले आहे त्यामुळे येणारी निवडणूक ही पंढरपूर मंगळवेढा विधानसभेची शरदचंद्र पवार पक्षाने दिलेल्या उमेदवाराला प्रचंड मतांनी निवडून देतील असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक व परिचारक गटाचे बाळासाहेब नेहतराव. संतोष नेहतराव, डी राज सर्वगोड, भाजपचे युवा मोर्चा प्रदेश सचिव नितीन काळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव जयंतराव पाटील यांच्या शुभहस्ते यांचा प्रवेश करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व्यापार उद्योग सेलचे प्रदेशाध्यक्ष श्री नागेश फाटे, पंढरपूर शहर अध्यक्ष श्री सुभाष भोसले, पंढरपूर तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, तसेच महाविकास आघाडीचे व मित्र पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दलित वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे करणारे महायुतीचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांना बहुसंख्य मतांनी विजयी करा : अजय मुकणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : भाजपा व महायुतीचे अधिकृत उमेदवार मा आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या प्रचारर्थ आज सकाळी भिमनगर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व शहर अध्यक्ष अजय मुकणार यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रा काढून डोर टु डोर प्रचार करण्यात आला.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अक्कलकोट नगरीचे नगरसेवक मा मिलन दादा कल्याणशेट्टी, नगरसेवक महेशजी हिंडोळे, नगरसेवक यशवंत तात्या धोंगडे, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजनजी, नन्नू कोरबू, प्रमुख उपस्थित होते. यावेळी भीमनगर पंचकमीटीचे सदस्य दत्ता मडीखांबे,कल्याणी घाटगे, विजयकुमार बाळशंकर, भारत सोनकांबळे, संदिप मडिखांबे, रामा मडिखांबे, प्रशिक बनसोडे, रोमित मडीखांबे, नागराज कुंभार, लखन झंपले, शुभम मडिखांबे,विजय मडीखांबे, अजय मडीखांबे, पुट्टू मडीखांबे.नितेश मडिखांबे, नागेश मडिखांबे, प्रकाश किरात, दशरथ मडिखांबे,



विरपक्ष माने, नागेश शिंगे, अंबादास बनसोडे, सब्बमित्त सोनकांबळे, बंटी मडिखांबे, गुंडू कांदे, देविदास कवटगी, प्रकाश मडिखांबे, सिध्दाराम मडिखांबे, स्वामी घाटगे, राजू मडिखांबे, भीम मडिखांबे, दयानंद बिडवे, राजू थंब, शकिल नायकवडी, भीमशा मडिखांबे, आतिश मडिखांबे, बसवराज मडिखांबे यांच्यासह भीमनगर मधील बहुसंख्य महिला व नागरिक उपस्थित होते.

**सर्वसामान्यांना आधार देणाऱ्या अभिजीत पाटील यांना साथ द्या : ज्योतीताई कुलकर्णी**

**अभिजीत पाटील यांना विधानसभेत पाठवण्याचा मतदार संघातील नागरिकांचा निर्धार**

# शेतकऱ्यांचा सन्मान जपणाऱ्या अभिजीत पाटील यांना विधानसभेत पाठवा : नितीन कापसे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सहकार क्षेत्रात चांगली कामगिरी करून बंद पडलेले साखर कारखाने सुरू करून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी झटणारे आणि माढ्याचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून काम करणार अभिजीत पाटील यांना विधानसभेत पाठवण्याचा निर्धार माढा मतदार संघातील जनतेने केला असल्याचे प्रगतीशील द्राक्ष बागायतदार नितीन कापसे यांनी सांगितले.

माढा विधानसभा मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्याकडे जात असताना अभिजीत पाटील यांना मतदार संघातील प्रमुख नेते मंडळी आणि सर्व क्षेत्रातील नागरिकांचा पाठिंबा मिळताना दिसत आहे.

आधी केले मग सांगितले या उक्ती प्रमाणे अभिजीत पाटील यांनी कोरोना काळात आर्थिक नुकसान सहन करून कोविड हॉस्पिटलची निर्मिती करून बेड उपलब्ध करून दिले आहेत. तसेच राज्यातील नागरिकांसाठी आर्थिक नुकसान करून ऑक्सिजन प्लांटच्या माध्यमातून नागरिकांचा जीव वाचवण्याचे पुण्याचे काम केले आहे. राज्यात ऊस दराची स्पर्धा लावून शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीसाठी काम केले आहे. याचबरोबर त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून काम करत असल्याचे ज्योती कुलकर्णी यांनी सांगितले.

**केवड, बुद्रुकवाडी, धानोरे, कापसेवाडी, वाकाव, उपळाई खुर्द, वडाचीवाडी, रोपळे खुर्द, उपळाई बुद्रुक, अंजनगाव खेलोबा या ठिकाणी गावात प्रचार दौरा पार पडला.**

माढा विधानसभा मतदारसंघात कमी वेळात त्यांनी सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे काम केले आहे. याची दखल घेऊन सर्वसामान्यांच्या हितासाठी शरद पवार यांनी अभिजीत पाटील यांना माढा विधानसभेच्या मैदानात उतरवले आहे. निवडणूक प्रचारादरम्यान ते विधानसभा मतदारसंघात प्रलंबित असलेल्या विकास कामांवर विद्यमान आमदारांवर आरोप करत असले तरी त्यावर ते माढ्याचे व्हिजन सांगून उपायही सांगत आहेत. कोणताही राजकीय वारसा नसतानाही केलेल्या कामांमुळे मतदार संघातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी त्यांच्यावर विश्वास ठेवून माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभिजीत पाटील यांना विधानसभेत पाठवण्याचा निर्धार मतदार संघातील नागरिकांनी केला आहे.

## थोडक्यात...

### चारचाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : विजापूर-सोलापूर हायवे रोड दरम्यान दत्तात्रय विठ्ठल पाटील (वय-५३, रा. मु. पो. हिपळे, ता. दक्षिण सोलापूर) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी मुलगा अभिषेक दत्तात्रय पाटील (वय २२, रा. हिपळे, ता. दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून चारचाकी क्रुझर वाहन (क्रमांक के ए २७ ए ६५५१) या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, दत्तात्रय पाटील व द्रौपदी विलास सलगर (वय ५४) हे दोघे विजापूर सोलापूर हायवे रोड सोरेगाव मार्गे दुपारी एक वाजता येताना सोरेगाव बस स्टॉप कुमठे गावच्या दिशेने जाणाऱ्या चारचाकी क्रुझर वाहन चालकाने धडक दिल्याने यात दुचाकी चालक दत्तात्रय पाटील हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर द्रौपदी सलगर या जखमी झाल्या. क्रुझर चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन अतिवेगाने निष्काळजीपणाने चालवून दुचाकी चालकाच्या मृत्यू कारणीभूत झाला आहे असे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

# सांगोला विधानसभा मतदारसंघाचे शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांना भाळवणीतून कॉर्नर सभेस प्रचंड गर्दी

## तरुण कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिक महिला यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**विरोधकांकडून माझ्या कार्यकर्त्यांना धमकावली जात आहे स्वर्गीय आबासाहेब यांचे स्टेटस ठेवू नका, पोस्ट टाकू नका अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्या जात आहेत मात्र या सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये असलेल्या स्वर्गीय आबासाहेब व देशमुख कुटुंबाला तुम्ही कसा बाहेर काढणार? मायबाप जनतेला धमक्या देऊन नाहीतर प्रेमाने आत्मसात करत त्यांच्यासाठी दिवस रात्र काम करणारा लोकप्रतिनिधी हवा आहे म्हणून सर्वसामान्य जनता आज माझ्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या सभेला भाळवणी गटातून मोठी गर्दी होती.

सांगोला विधानसभा निवडणुकीमुळे सांगोला विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाकडून जोरदार प्रचार सुरू आहे व सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी इंडियन अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या प्रचारात आज शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी भाळवणी गटात कॉर्नर सभा संपन्न झाली कॉर्नर सभेला भाळवणी गटातील सर्व गावांमध्ये प्रचंड असा प्रतिसाद मिळाला व गावोगावी नागरिकांनी डॉक्टर बाबासाहेब डॉक्टर अनिकेत देशमुख यांचे जोरदार जंगी स्वागत करण्यात आले महिला भगिनींनी ऑप्शन करून करत डॉक्टरांना बाबासाहेब देशमुख यांना विजयाचे विश्वास दिला असलेले तरुण कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिक महिला यांचा उत्स्फूर्त प्रसिद्ध असा सहभाग करणार सभेत पहायला मिळाला आहे.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील बाळवणी गटात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व डॉक्टर अनिकेत देशमुख यांचे स्वागत करण्यासाठी प्रत्येक गावामध्ये महिला भगिनी मुले व ज्येष्ठ नागरिक तरुण हे आतुरतेने थांबत असल्याचे चित्र दिसून आले आहे.

महाविकास आघाडी व मित्र पक्षाची पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला प्रत पात्र राहत मागील तीन वर्षांमध्ये केलेल्या समाजसेवेची ही पोच पावती असल्याचे डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

भावनिकटातील प्रत्येक गावात ओन्ली डॉक्टर बाबासाहेब देशमुख असे नागरिक ठणकावून सांगत आहेत इतर उमेदवारांना आम्ही या निवडणुकीत त्यांची जागा योग्य पद्धतीने दाखवणार आहोत ही लढाई भ्रष्टाचार परिवार गद्दारविरुद्ध सामान्य निष्ठावान आपला माणूस यांच्यातच होत आहे गेल्या पाच वर्षात आम्हाला लोकप्रतिनिधीकडून मठात त्रास सहन करावा लागला आहे.

प्रत्येक कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून सांगोला मतदारसंघाचे नाव धुळीस मिळवले आहे गुंडगिरी भ्रष्टाचार मुक्त मतदारसंघ करण्यासाठी आम्ही डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहोत टक्केवारी मागणार यांना मत मागण्याचा अधिकार नसून निवडणुकीपुरते भाळवणी गट आठवणार यांना आम्ही योग्य जागा दाखवून देणार असल्याचे प्रत्येक गावातील ग्रामस्थ संतापाने सांगत होते.

# महापुरुषांनी मानवी मूल्ये जोपासली : सुनिल वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेद्वारे या देशातील जनतेला न्याय दिला . भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आधुनिक भारताचा पाया उभा केला. त्यांनी देशात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला उभारी दिली. भगवान गौतम बुद्धाच्या पंचशील तत्त्वाचा स्वीकार केला.

आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांनी समाज सुधारक महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासोबत सावलीप्रमाणे उभे राहिले.

महापुरुषांनी मानवतेच्या कल्याणासाठी कार्य केले असून त्यांचे विचार आपण आचरणात चिंतनात आणली पाहिजेत असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिलजी वारे यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संगमवाडी, येथील लहुजी वस्ताद साळवे यांच्या समाधीस्थळी तसेच रामोशी गेट, पुणे येथील स्मारकातील लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यास मा महासंचालक यांनी अभिवादन केले.

संगमवाडी येथील समाधीस्थळी बार्टी संस्थेच्या वतीने



डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महापुरुषांच्या जिवनावरिल मौल्यवान पुस्तके नागरिकांना अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आले होते.

यावेळी बार्टीच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, रविन्द्र कदम, उमेश सोनवणे, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, सुमेध थोरात आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्री नरेश गोटे यांनी मानले.

# बावडा येथे खा.सुप्रिया सुळे यांची शनिवारी सायंकाळी ७ वा. सभा

## खा.धैर्यशील मोहिते पाटील उपस्थित राहणार!







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना (उबाठा) यांच्या महाविकास आघाडीचे उमेदवार व बावडा गावचे सुपुत्र हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ संसदरत्न खा.सुप्रिया सुळे यांची जाहीर प्रचार सभा बावडा येथे शनिवारी (दि.१६) सायंकाळी ७ वा. आयोजित करण्यात आली आहे. या सभेस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खा. खा.धैर्यशील मोहिते पाटील हेही उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन भाऊ पाटील यांचे बावडा हे गाव असल्याने या सभेला उच्चांकी गर्दी होणार असून, बावडा-लाखेवाडी जि. पं. मतदारसंघ हर्षवर्धन पाटील यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. सदर सभेमध्ये खा. सुप्रिया सुळे, खा.धैर्यशील मोहिते पाटील काय बोलतात याकडे तालुक्याचे लक्ष लागून राहीले आहे. बावडा येथे होणाऱ्या या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.



# ओबीसीचे प्रश्न सोडविण्यासाठी ओबीसी उमेदवार विजयी करा : प्रा.टी.पी.मुंडे

**लोहा- कंधार मतदार संघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ सभेस मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : बहुजन आघाडी व मित्रपक्ष आघाडीचे ८८ लोहा कंधार विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार चंद्रसिंग पाटील सुरनर यांच्या प्रचारार्थ बारूळ येथे ओबीसी बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसीचे नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी ओबीसीचा आवाज बुलंद करण्यासाठी आणि प्रश्न सोडविण्यासाठी बेट या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांना महाराष्ट्राच्या विधानसभेत पाठवा असे आव्हान येथील प्रचार सभेत केले.८८ लोहा कंधार विधानसभेचे नांदेड जिल्ह्यातील उमेदवार चंद्रसेन पाटील सुरनर यांच्या प्रचारार्थ सभा बारूळ येथे संपन्न झाली यावेळी व्यासपीठावर ओबीसी बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.श्री प्रकाश अण्णा शेंडगे सोशालिस्ट रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष एडवोकेट सुरेश जी माने ओबीसी बहुजन आघाडीचे कोषाध्यक्ष जेडी तांडेल आदीसह नेते मंडळी उपस्थित होते. यावेळी ओबीसी नेते प्रा.टी.पी मुंडे बोलताना म्हणाले की ओबीसीच्या न्याय हक्कासाठी ओबीसी उमेदवार निवडून देणे ही काळाची गरज आहे. ओबीसीच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ओबीसी उमेदवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आव्हान त्यांनी केले.

## महायुती आणि मविआ ने तिकीट वाटप करतांना घराणेशाहीला प्राधान्य दिले

## भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील उमेदवारांना वंचितचा पाठिंबा

# तिरोडा विधानसभा क्षेत्राचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अतुल गजभिये यांना जाहीर पाठींबा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया/प्रतिनिधी : दि.१३ नोव्हेंबर रोजी विधानसभा तिरोडा येथील झालेल्या वंचित बहुजन आघाडीच्या सभेदरम्यान तिरोडा विधानसभा क्षेत्रातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अतुल गजभिये यांना पत्र देऊन विचार महामानवांचे नवयुवा मंच भंडारा गोंदिया तर्फे भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या सर्व उमेदवारांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. महायुती आणि मविआ ने तिकिट वाटप करतांना घराणेशाहीला प्राधान्य दिले आहे. ५२ टक्के ओबीसी, १६ टक्के मुस्लिम, १३ टक्के एस. सी आणि ७ टक्के आदिवासी यांना लोकप्रतिनिधी म्हणून संधी दिली नाही तर केवळ मतदार म्हणून वापरुन घेतले आहे.

पण वंचित बहुजन आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सर्व जाती धर्माच्या लहान-मोठया, सामान्य ज्यांना आज पर्यंत कुणी साध पंचायत समिती ची तिकीट दिली नाही अशा लोकांना बाळासाहेबांनी लोकसभेचे आणि विधानसभेचे तिकीट दिले म्हणून आम्ही विचार महामानवांचे नवयुवा मंच संघटनेचा पाठिंबा देत आहोत, असे अध्यक्ष- आकाश शेंडे म्हणाले.

आज आरक्षण वर्गीकरण हा मुद्दा भविष्यासाठी खूप मोठा प्रश्न आहे. विरोधी पक्ष यावर एक शब्द सुद्धा बोलायला तयार नाहीत. त्यामुळे एस.सी, एस.टी, ओबीसी जातीच्या पुढील पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यावर काहीच बोलत नाही त्यामुळे यांच्यावर आमचा विश्वास राहिला नाही.

आज बाळासाहेब आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी या पक्षामधे सर्व एस.सी, एस.टी, ओबीसी, मुस्लिम इतर वंचित जातींच्या न्याय हकाची लढाई लढण्याची ताकद दिसून येत आहे. आज अनेक पक्ष उमेदवारी देतांना फक्त घराणेशाही वर भर देत आहेत परंतु बाळासाहेब आंबेडकर यांनी आपल्या वंचित बहुजन आघाडी पक्षामधे सर्व जातीतील लोकांना उमेदवारी दिले आहे. कारण जर त्या जातीतील लोकांना उमेदवारी दिली तर ते त्या समाज जातीतील प्रश्न विधानसभेमध्ये मांडून आपला समाजाचा विकास करू शकतात. त्यामुळे आम्ही वंचित बहुजन आघाडीला जाहीर पाठिंबा देत आहोत, असे उपाध्यक्ष- वैभव मोटघरे म्हणाले.

आज देशात आणि राज्यात बघता सत्ताधारी आणि विरोधक संविधान आणि आरक्षणाच्या नावाखाली मतदारांचा निवडणूक पुरता वापर करतांना दिसून येत आहेत. जेव्हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्ष व बाकीचे पक्ष एवढे विचार करत नाही परंतु सत्तेत नसतांना सुद्धा बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक जाती धर्माच्या आणि महत्त्वाचे म्हणजे आरक्षण बचावासाठी ओबीसीच्या आरक्षण वर्गीकरणाच्या विरुद्ध आवाज उठविला असे नेतृत्व पुढील पिढीच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. म्हणून आम्ही विचार महामानवाचे भंडारा गोंदिया जिल्हा या संघटनेमार्फत जाहीर पाठिंबा देत आहोत, असे महासचिव- लोमेश सांगोळे म्हणाले.

आपल्याला माहीतच आहे की काँग्रेसच्या काळापासून आणि आताचे सत्ताधारी पक्ष बीजेपी हे आंबेडकरवादी विरोधच करत आलेले आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत संविधान बचाओ म्हणून मोहीम काँग्रेसने काढली होती. त्यात ते यशस्वी पण झाले होते. बौध्द समाजाचे मतदान पण त्यांनी घेतली पण जेव्हा एस.सी आणि एस.टी चा वर्गीकरण करून क्रिमीलेयरचा मुद्दा आला तेव्हा तो लागू करू म्हणले अशी विषारी भूमिका त्यांनी घेतली. सध्याच्या घडीला मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा वाद पेटला आहे. वंचित बहुजन आघाडीची भूमिका ओबीसीचे ताट वेगळे आणि मराठ्यांचे ताट वेगळे असे जाहीर मत आहे. ओबीसीच्या ताटात मराठा नको अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. भिमा कोरेगांव, बौद्ध लेण्या औरंगाबाद आणि दिक्षाभूमी नागपूर याठिकाणी अतिक्रमण झालं तेव्हा बाळासाहेब आंबेडकर समोर येऊन अन्यायाविरोधात लढत राहिले. त्यामुळे आम्ही वंचित ला जाहीर पाठिंबा देत आहोत, असे सचिव- हर्षपाल लोणारे म्हणाले.

सद्याच्या स्थितीला एस.सी, एस.टी, ओबीसीच्या आरक्षणावर लढाणारा एकमेव व्यक्तींमहत्व ते म्हणजे बाळासाहेब आंबेडकर आहेत आणि एकमेव पार्टी म्हणजे वंचित बहुजन आघाडी आहे त्यामुळे आमच्या हक्कासाठी जे लढत आहेत असे वंचित बहुजन आघाडीला आम्ही पाठिंबा देत आहोत, असे संघटक- विश्वरत्न रामटेके म्हणाले.

यावेळी विचार महामानवांचे नवयुवा मंच भंडारा-गोंदिया चे अध्यक्ष आकाश शेंडे, उपाध्यक्ष वैभव मोटघरे, महासचिव लोमेश सांगोळे, सचिव हर्षपाल लोणारे, संघटक विश्वरत्न रामटेके, सदस्य प्रशिक मोटघरे उपस्थित होते.